# सलणारा सल - भाग ३

“सर मी तुमची फाईल वाचली. काल रात्रभर जागून मी ती पूर्णपणे वाचून काढली. काल तुम्ही ही फाईल इथेच विसरून गेला होतात. माझ्या हे लक्षात आलं तेव्हा मला वाटलं, ऑफिसच्या कामाची महत्त्वाची डॉक्युमेंट्स असतील तुमची. तुम्ही काळजी कराल. म्हणून मी त्यात तुमचा कॉन्टॅक्ट नंबर, पत्ता, शोधत होते. तो नव्हता. फक्त तुमचं नाव लिहिलेलं होतं. आणि तुमची सही होती. मग मी विचार केला की उद्या तुम्ही संध्याकाळी इथे याल तेव्हा ही फाईल तुम्हाला द्यावी. ती इथेच ठेवण्यापेक्षा माझ्या घरी न्यावी असं मी ठरवलं. खरं तर मला ती पूर्ण वाचायची उत्सुकता वाटली. म्हणून मी घरी नेली असं म्हणा हवं तर. ती घरी नेऊन मी पूर्ण वाचून काढली. पण सर, माझी कहाणी थोडी वेगळी आहे. तुम्ही लिहिलेल्या यांपैकी कुणाच्याच कहाणीसारखी नाहीये. मी पण फसवली गेलेय... माझीही कथा लिहा ना सर. तुम्ही ऐका. आणि मग ठरवा, तुमच्या पुस्तकात ती घ्यायची का नाही ते.”

ती फारच अडून बसल्यासारखी बोलत होती.

एकदा वाटलं, आता हिची कहाणी इतक्या सगळ्याजणींपेक्षा आणखी काय वेगळी असणार आहे? ऐकत बसण्यात उगीचच वेळ जायचा...

पण मलाही आता तिच्याबद्दल थोडी थोडी सहानुभूती वाटू लागली होती.

मग मी तिची कहाणी ऐकायचं ठरवलं. अजून एक कथा लिहायची का, पुस्तकात ॲड करायची का, ते नंतर पाहू, असा विचार केला.

तिला म्हणालो, “हं. ठीक आहे. सांग. तुझ्या बाबतीत काय घडलं? कशी फसवली गेलीस?”

आणि पुढे तोंडातल्या तोंडात पुटपुटलो, “बिचारी!” पण तिच्या ते कानावर पडलंच.

ती म्हणाली, “सॉरी सर. मी बिचारी अजिबात नाही. मी कॉलेजमध्ये शिकतेय. एका लेडीज हॉस्टेलमध्ये रहाते. दररोज संध्याकाळी या हॉटेलमध्ये येऊन वेट्रेसचं काम करते. पण ते माझं मी निवडलं आहे. कोणतंही काम करण्याचा कमीपणा वाटू नये

म्हणून. ग्रॅज्युएशन झाल्यावर लॉ करायचं ठरलं होतं माझं. तुम्ही जसं या पीडित मुलींसाठी काम करताय ना, तसं ह्या अशा पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी मला लॉ करायचं आहे."

मला तिची कथा इंटरेस्टिंग वाटली.

"पण असं पीडितांना न्याय वगैरे कसं आलं तुझ्या डोक्यात?" मी विचारलं. "तुझ्यावर काही अतिप्रसंग ..."

"माझ्यावर नाही सर. माझ्या आईवर. आईने माझ्या बाबाशी लव्ह मॅरेज केलं होतं. घरच्या सगळ्यांच्या विरोधात जाऊन. पण लग्नानंतर तिला बाबाचा खरा स्वभाव कळला. त्याला खरंतर लग्न वगैरे नको होतं. माझी आई दिसायला सुंदर होती. बाबाने लग्न केलं, संसार मांडला. आईशी संग केला. तिचा उपभोग घेतला. आणि काही महिन्यांनी तो आईला सोडून कुठेतरी निघून गेला. कायमचा ! आईने वाट पाहिली. पण तो आलाच नाही परत. रहात असलेल्या जागेचं भाडं भरायला पैसे नाहीत, सासर- माहेर दोन्ही घरं तुटलेली... मी तिच्या पोटात होते. बाबाला माहीत होतं हे. मात्र त्याला कसली जबाबदारीच नको होती. पण माझी आई मानी होती. इंटर पर्यंत कॉलेज शिकली होती. कष्ट, मेहेनत करायची तिची तयारी होती. तिनं दुसऱ्या गावात जाऊन स्वतःची सोय कुठे होते का पाहायचं ठरवलं. दुसऱ्या गावात आल्यावर एका धनिकानं तिला आसरा दिला. त्याची बायको अस्थमापीडित होती. आईने तिला घरकामात मदत करायची, त्याच्या मुलांचा अभ्यास घ्यायचा, बाजारहाट करायचा, आणि त्याबदल्यात थोडे पैसे आणि आईची रहायची-खायची सोय त्या माणसाने केली. माझा जन्म झाला ..." सांगताना तिचे डोळे भावूक झाले होते. पण तिचा स्वर मात्र स्वच्छ होता.

मध्येच कॉफीचा एक घोट घेऊन ती पुढं सांगू लागली, "मला आईनं शाळेत घातलं होतं. आता आम्ही एक छोटी भाड्याची खोली घेऊन वेगळं राहू लागलो होतो. सगळं ठीक होतं. मी आठवीत असताना त्या धनिकाची अस्थमापीडित बायको वारली. तेव्हा त्याने माझ्या आईशी लग्न करायचा प्रस्ताव मांडला. आईला ते नको होतं. तिला माझं शिक्षण महत्त्वाचं वाटत होतं. तिने लग्नाला नकार दिला. मात्र ती त्याच्या घरचं काम करायला त्याच्याकडे जात होती. पण त्याने एकदा आईवर जबरदस्ती करायचा प्रयत्न केला. आईने मला सारं सांगितलं. आम्ही दोघींनी ठरवलं, ते गाव सोडायचं.

कुणालाच सांगितलं नाही. आमची जमा पुंजी-पैसे, आणि थोडं सामान घेऊन गुपचूप दोन दिवसात ते गाव सोडलं ..."

ती माझ्या नजरेला नजर भिडवून बोलत होती. अगदी बिनधास्तपणे.

"आम्ही दोघी मुंबईला आलो. ह्या अफाट नगरीनं आम्हाला आसरा दिला आणि सन्मानानं जगवलं! आई शाळेत नोकरी करतेय. उपनगरात चाळीत एक खोली भाड्यानं घेऊन राहतेय. चाळीतली आजूबाजूची माणसं जोडली आहेत तिने. कुणीही कधीही हाकेला धावून येतील अशी. एक मुलगी पेईंगगेस्ट म्हणून ठेवलीय. आईला सोबत होते आणि पैसेही मिळतात. मी शनिवारी-रविवारी तिच्याकडे राहायला जाते. खरंतर माझ्या कॉलेजसाठी म्हणून मी इकडे हॉस्टेलवर राहतेय. त्यामुळे माझा ट्रॅव्हलटाईम वाचतो. अभ्यासाला वेळ मिळतो. आणि हा वेट्रेसचा जॉब पण करता येतोय. आमचं छान चाललं आहे." ती बोलायची थांबली.

"ओह...!! पण तुझी कथा तू मला माझ्या पुस्तकात लिहा म्हणून का इन्सिस्ट करते आहेस ते नाही कळलं." मी अनवधानानं विचारलं.

"सर, फाईलमध्ये शेवटी जेव्हा मी तुमचं नाव वाचलं, त्याचवेळी तुम्ही लिहिलेल्या सर्वांच्या कथा वाचायचं माझ्या मनांत आलं..."

नकळत माझ्या मनांत स्वत:बद्दल आत्मप्रौढी वाटली. तिला हे जाणवलं बहुदा.

ती पुढे म्हणाली, "या सगळ्या मुलींच्या सत्यकथा- कहाण्या लिहिण्यामागे तुमच्या मनांत एक गिल्ट होता. आत्ताच तुम्ही मला तसं म्हणालात. आता तुम्हाला तो गिल्ट वाटत नाहीये. त्याचं कारण तुम्ही मला सांगितलंत. पण सर, ते कारण खरं नाहीये, आय मीन म्हणजे मला तरी तसं वाटत नाही"

"म्हणजे? मी नाही समजलो..." मी म्हणालो.

"सर... बाबा..." ती माझ्याकडं एकटक पहात म्हणाली.

मी चमकलो.

ती पुढे सांगत होती - "मी फाईलमधे तुमचं नाव वाचलं. तुमची लफ्फेदार सही ... आईच्या आणि तुमच्या मॅरेज सर्टिफिकेटवरची ... एक-दोन वेळाच पाहिली होती ... पण कायम स्मरणात राहिली होती माझ्या! तुम्ही माझे खरे वडील आहात! मी तुमची मुलगी आहे. आर्या आणि भास्करची मुलगी आभा भास्कर देसाई. आणि मी तुमचंच

नाव लावते आहे. आता तुमचा गिल्ट तुम्ही तुमच्या डोक्यात तसाच ठेवा. हा गिल्ट ह्यापुढे कधीच तुमच्या डोक्यातून जाणार नाही. तुम्ही कितीही प्रयत्न केला तरीही! तुम्ही तुमच्याकडून तुमची ‘फाईल’ बंद केलीत खरी. पण आता ती परत ओपन झाली आहे!”

तिचे शब्द माझ्या कानावर जोरात आदळत राहिले ... गेली बावीस वर्ष जे विसरण्याचा प्रयत्न करत होतो ते मनाचा तळ ढवळून काठावर आलं... तिला सत्य सांगवं असं वाटलं. उशीरा सुचलेल्या शहाणपणातून मी आर्याकडे वापस गेलोही होतो. पण आर्या तिथून निघून गेली होती. तिचा शोध घ्यायला मी असमर्थ ठरलो. आणि हा सलणारा सल घेऊन मुंबईला आलो हे तिला सांगायचं होतं.

पण तोपर्यंत ती टेबलावरून उठून कधीच हॉटेलच्या बाहेर पडली देखील होती ...

(समाप्त)

----------x----------x----------


लीना माटे

मो. 9819534428

304, अथर्व, माधव गडकरी चौक,

विलेपार्ले पूर्व, मुंबई 400 057